# नस्योपचारार्थ कल्पना


## वै. भातांब्रे योगेश शिवमूर्ती

प्रपाठक, रसशास्त्र व भै. कल्पना विभाग,

सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, पुणे

मो. ९८२२४२२२९७

## नस्योपचार्थ कल्पना:

नासा अथवा नासिकेद्वारा औषध ग्रहण करण्याच्या क्रियेला नस्य अथवा नावन असे म्हणतात.

नस्यं तत् कथ्यते धीरैर्नासाग्राह्यं यदौषधम् ।
नावनं नस्यकर्मेति तस्य नामद्वयं मतम् ।।

शा. सं. उ. खं. 8/1

औषधमौषधसिध्दो वा स्नेहो नासिकाभ्यां दीयत इति नस्यम् ।

सु. चि. 40/21

## नस्य प्रकारः

**1. शारंगधर - 2 (शा. सं. उ. खं. 8/2)**

1. रेचन (कर्षण) 2. स्नेहन (बृंहण)

रेचन/शिरोविरेचन नस्याचे 2 प्रकार - 1. अवपीड 2. प्रधमन
(शा. सं. उ. खं. 8/11)

स्नेहन/बृंहण नस्याचे 2 प्रकार - 1. मर्श 2. प्रतिमर्श

**2. सुश्रुत - 2 व 5 (सु. चि. 40/21)**

1. शिरोविरेचन 2. स्नेहन

1. नस्य 2. शिरोविरेचन 3. प्रतिमर्श 4. अवपीड 5. प्रधमन

नस्य व शिरोविरेचन यांना प्रमुख, तर प्रतिमर्श - नस्य विकल्प व अवपीड, प्रधमन - शिरोविरेचन विकल्प म्हणून सांगितले आहे.

## नस्य प्रकार:

**3. चरक - 5 (च. सि. 9/89) व 3 (च. सि. 9/92)**

1. नावन 2. अवपीड 3. ध्मापन 4. धूम 5. प्रतिमर्श

कर्म भेदाने 3 प्रकार - (च. सि. 9/92)

1. रेचन (शिरोविरेचन) 2. तर्पण 3. शमन

1. रेचन - कफज विकार (शिर:स्तंभ, गुरुता, इ.)
2. तर्पण - वातज विकार (शिर कम्प, अर्दित, इ.)
3. शमन - रक्त, पित्त विकार

## 1. नावन/नस्य:

नावन यास नस्य पण असे म्हणतात.

यात नस्यासाठी विशेषतः **स्नेह द्रव्याचा** वापर केला जातो.

**प्रकार- 2 (च. सि. 9/90):**

1. स्नेहन 2. शोधन

**उपयोग-** शिर शून्यता, ग्रीवा-स्कंध-वक्ष बलवर्धन, दृष्टी प्रसादन, इ.

## 2. अवपीडः

कल्कीकृतादौषधाद्यः पीडितो निःसृतो रसः ।
सोऽवपीडः समुद्दिष्टस्तीक्ष्णद्रव्यसमुद्भवः ।।

शा. सं. उ. खं. 8/12

अवपीडः तीक्ष्ण द्रव्यांचा कल्क पिळून प्राप्त स्वरसाचे नस्य

प्रकार- 2 : 1. स्तंभन 2. शोधन (च. सि. 9/90)

मात्रा- 8, 6 व 4 बिंदु क्रमशः उत्तम, मध्यम व अंतिम (अधम) मात्रा

उपयोग- गलरोग, विषमज्वर, अत्याधिक निद्रा, मनोविकार, कृमी, इ.

## 3. ध्मापन/प्रधमनः

षडङ्गुला द्विवक्त्रा या नाडी चूर्णं तया धमेत् ।
तीक्ष्णं कोलमितं वक्त्रवातैः प्रधमनं हि तत् ।।

शा. सं. उ. खं. 8/13

सहा अंगुल लांब व दोन्ही बाजुला मुख असणाऱ्या नलिकेमध्ये तीक्ष्ण औषधी द्रव्यांचे चूर्ण 1 कोल मात्रेमध्ये घेवून रुग्णाच्या नाकामध्ये मुखातील हवेच्या सहाय्याने फुंकण्याच्या क्रियेला प्रधमन नस्य असे म्हणतात.

मात्रा- 1 कोल (तीक्ष्ण औषधी द्रव्यांचे चूर्ण)

उपयोग- दोष खूप वाढलेले असताना, मूर्च्छितावस्था, इ.

## 4. धूम नस्य:

यात औषधसिध्द प्रज्वलित धूमवर्तिचा धूर धूमनेत्राच्या सहाय्याने नासाद्वारे आत घेतला जातो व मुखाद्वारे बाहेर सोडला जातो.

या प्रकाराचे विस्तृत वर्णन धूमपान कल्पनेमध्ये केले आहे.
आ. चरकांनी धूम कल्पना नस्य कल्पने अंतर्गत वर्णन केली आहे.

प्रकार- 3 : 1. प्रायोगिक 2. स्नैहिक 3. वैरेचनिक (च. सि. 9/91)

विधी- रुग्णाला सुस्थितीमध्ये बसवावे. धूमनेत्रामध्ये औषधी द्रव्य घेवून अग्निच्या सहाय्याने प्रज्वलित करुन रुग्णाची एक नाकपुडी बंद करुन दुसऱ्या नाकपुडीमध्ये धूमनेत्र घुसवावे व नासाद्वारे श्वास घेण्यास सांगून मुखाद्वारे सोडण्यास सांगावे. अशीच कृती दुसऱ्या नाकपुडीद्वारे करावी.

उपयोग- शिरोगौरव, शिर:शूल, प्रतिश्याय, दन्तदौर्बल्य, मुख दुर्गंध, स्वरभेद, वातकफज विकार, इ.

**5. प्रतिमर्श:** प्रतिमर्श व मर्श नस्यामध्ये स्नेह द्रव्याचा नासाद्वारे प्रयोग केला जातो. यात मुख्यत: दोघांच्या मात्रेमध्ये फरक आहे. आ. शारंगधरांनी स्नेहन/बृंहण नस्याचे मर्श आणि प्रतिमर्श हे 2 प्रकार सांगितले आहेत.

| प्रतिमर्श नस्य | मर्श नस्य |
|---|---|
| मात्रा: 2 बिंदु | मात्रा: 8 बिंदु (शा. सं. उ. खं. 8/39) |
| प्रतिदिन घेता येते | प्रतिदिन नाही- एक/दोन दिवस अंतराने |
| स्वस्थ व्यक्तिमध्ये वापरतात | रोगी व्यक्तिमध्ये वापरतात. |
| अल्प प्रभावकारी | शीघ्र प्रभावकारी |
| अल्प गुणयुक्त | उत्तम गुणयुक्त |
| पथ्यापथ्य आवश्यक नाही | पथ्यापथ्य पालन आवश्यक |
| निरुपद्रवकारक | उपद्रवकारक |

## नस्यप्रयोग विधीः (शा. सं. उ. खं. 8/50)

प्रयोग स्थान हे निर्वात व धूलिकण रहित असावे. ज्या व्यक्तिला नस्यप्रयोग करावयाचा आहे - त्याला प्रथम दंतधावन करुन धूमपान द्यावे. कपाळ व गल भागी स्वेदन करुन उत्तान अवस्थेमध्ये डोक्याकडील भाग खाली व पायाकडील भाग थोडा वर राहिल अशाप्रकारे झोपवावे. दोन्ही हातात व पायात अंतर ठेवण्यास सांगून डोळे वस्त्राच्या सहाय्याने झापावेत. नंतर नाकाचा अग्रभाग थोडा वर करुन चिकित्सकाने नस्याचा प्रयोग करावा. नस्योपयोगी द्रव्य हे कोष्ण असावे. सुवर्ण, रजत, कापूस अथवा अन्य साधनाने युक्तिपूर्वक नस्य द्रव्य नाकात सोडावे. प्रयोगावेळी- डोके हलवू नये, क्रोध, बोलणे, हसणे, इ. गोष्टी करु नये म्हणून सांगावे. असे केल्यास स्नेह द्रव्य आतपर्यंत व्यवस्थित पोहोचत नाही व त्यामुळे कास, प्रतिश्याय, शिरोरोग, नेत्ररोग, इ. उत्पन्न होतात.

## नस्य मात्राः

### 1. शिरोविरेचन स्नेहः

8, 6 व 4 बिंदु क्रमशः उत्तम, मध्यम व अंतिम मात्रा

(शा. सं. उ. खं. 8/8)

### 2. स्नेहन नस्यः

64, 32 व 8 बिंदु क्रमशः उत्तम, मध्यम व हीन मात्रा

(शा. सं. उ. खं. 8/27)

## नस्यासंबंधी नियमः

1. कफ, पित्त व वात विकारामध्ये क्रमशः प्रातःकाल, मध्यान्हकाल व सायंकाळी नस्य करावे. अत्यावश्यक असल्यास रात्रीपण नस्य करता येते.
2. वयाच्या 8 वर्षापासून 80 वर्षापर्यंत नस्य प्रयोग करावा.
3. 5, 7 अथवा 10 मात्रेपर्यंत नस्य धारण करावे. नंतर त्या व्यक्तिस उठून बसवावे व नासा किंवा मुखामध्ये जमा झालेला द्रव समोर न थुंकता/शिंकता डाव्या किंवा उजव्या बाजूला थुंकावा.
4. नस्य घेतल्यानंतर मानसिक संताप, क्रोध व धूळ यांचा त्याग करावा व त्या व्यक्तिने 100 मात्रा काळापर्यंत सरळ झोपून राहावे.
5. नस्य प्रयोगानंतर धूमपान अथवा कवल करावे.
6. भोजन पश्चात, दुर्दिन, गर्भिणी, अजीर्ण, स्नेह-जल-आसव पान केल्यानंतर, बालक-वृध्द, वेगावरोधी, स्नान केलेला अथवा स्नान करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तिमध्ये नस्य प्रयोग करु नये.
7. वात कफज विकार - तेल, केवळ वात विकार - वसा व पित्त विकार - घृत, मज्जा नस्यासाठी वापर करावा.

## नस्य गुणः

ऊर्ध्वजत्रुगत विकार नष्ट होवून इंद्रिय प्रसन्न होतात.
हनु, दन्त, शिर, ग्रीवा, बाहु, वक्ष, इ. बलवान होतात.
वली, पलित, खालित्य व व्यंग रोगांची उत्पत्ति होत नाही.

## सम्यक् नस्य लक्षणः

शिर लाघवता, सुखपूर्वक निद्रा व जाग येते, विकार शान्त होवून इंद्रिय शुध्दि व मन प्रसन्न होते.

# Thank U